चातुर्मास

हिंदू धर्मकल्पनांनुसार आषाढ शुद्ध एकादशी ते कार्तिक शुद्ध एकादशी या चार महिन्यांच्या काळास चातुर्मास म्हणतात. जैन धर्मकल्पनेनुसार चातुर्मास आषाढ शुक्ल चतुर्दशीला सुरू होतो आणि कार्तिक पौर्णिमेपर्यंत चालतो. या काळात एरवी एका गावाहून दुसऱ्या गावाला विहार (प्रवास) करणारे जैन साधू एकाच गावात मुक्काम करतात.

चातुर्मास कालावधी

चातुर्मास म्हणजे चार महिने. आषाढाचे २० दिवस, श्रावण-भाद्रपद-आश्विन हे तीन पूर्ण महिने आणि कार्तिक महिन्याचे पहिले ११ दिवस.

भारतीय उपखंडात हा काळ मोसमी पावसाळ्याचा असतो. आषाढ शुद्ध एकादशीला सूर्य मिथुन राशीत येतो तेव्हा चतुर्मासाची सुरुवात होते. आषाढी शुद्ध

एकादशीला पद्मा एकादशी किंवा देवशयनी एकादशी असे म्हणतात. कार्तिक शुद्ध एकादशीस चातुर्मास संपतो तेव्हा सूर्य तुळा राशीत आल्यावर कार्तिक शुद्ध एकादशी येते. कार्तिक शुद्ध एकादशीस 'प्रबोधिनी एकादशी असे नाव आहे. कार्तिक शुद्ध द्वादशीला चतुर्मास नसतो. जैनधर्मीय आषाढ शुक्ल चतुर्दशी ते कार्तिक पौर्णिमेपर्यंतचा काळ हा चातुर्मासाचा कालावधी मानतात. चतुर्मासातल्या देवशयनी एकादशीला देव झोपतात आणि प्रबोधिनीला उठतात, अशी धारणा आहे.

ज्या वर्षी श्रावण , भाद्रपद किंवा आश्विन महिन्यात अधिक मास येतो, त्या वर्षी

चातुर्मास पाच महिन्यांचा असतो.

शेतीतील पेरण्या ज्येष्ठात होतात आषाढ येतो तेव्हा देव शयनात जातात,(अशी धारणा आहे) आश्विनात पिकांची तोडणी होते, कार्तिकात मळणी होऊन देवोत्थानची वेळ येते अशी हिंदू परंपरा आहे.

चातुर्मासात हिंदूंचे विवाहमुहूर्त नसतात.

व्रत-उपासना

या काळात हिंदू धर्म व जैन धर्मांत अनेक व्रत-उपासना केल्या जातात. या काळात हिंदू धर्मात वर्णिलेल्या संस्कारांपैकी यज्ञोपवीत संस्कार (मुंज), विवाह , दीक्षाग्रहण, यज्ञ , गृहप्रवेश, गोदान इत्यादी शुभ कर्म केली जात नाहीत असा धर्मशास्त्रीय संकेत रूढ आहे. भागवत पुराणानुसार विष्णूंच्या निद्रेस हरिशयन म्हंटले जाते.

विष्णुशयनोत्सव

आषाढ शुद्ध एकादशीला सर्वोपचारांनी युक्त अशा पलंगावर शंखचक्रादि आयुधांनी युक्त व लक्ष्मी पाय चुरीत बसली आहे अशी श्रीविष्णूची प्रतिमा ठेवून, तिची अनेक प्रकारच्या उपचारांनी पूजा करावी.

'सुप्ते त्वयि जगन्नाथे जगत्सुप्तं भवेदिदम् । विबुद्धे त्वथि बुध्यते तत्सर्वं सचराचरम् ॥

अशी तिची मग प्रार्थना करावी. त्या दिवशी उपास करून रात्री जागरण करावे. द्वादशीला पुन्हा पूजा करून, त्रयोदशीला- गायन, नर्तन, वाद्यवादन वगैरेंनी सेवा करावी. असे हे तीन दिवसांचे व्रत आहे. या बाबतीत स्मार्त आणि वैष्णव यांनी आपापल्या एकादशीला शयनीव्रताचा आरंभ करावा. रात्री शयनोत्सव करावा व दिवसास प्रबोधोत्सव करावा. द्वाद्शीला पारण्याच्या दिवशी शयनोत्सव आणि प्रबाधोत्सव हे करावेत, असे कोणी म्हणतात. या बाबतीत देशाचाराप्रमाणे वागावे. हे व्रत अधिक महिन्यात करू नये. आषाढ शुद्ध द्वादशीला जेव्हा अनुराधानक्षत्र नसेल तेव्हा पारणे करावे. त्यातही अनुराधा नक्षत्राचा पहिला चरण मात्र वर्ज्य समजावा. ज्यावेळी द्वादशी थोडी असून वर्ज्य नक्षत्राचा भाग द्वादशीचा अतिक्रम करीत असेल त्यावेळी निषेधाचा त्याग करुन, द्वादशीलाच पारणे करावे असे कौस्तुभात सांगितले आहे. संगवकालाचा भाग टाकून, सकाळी अथवा मध्यान्हकाळी जेवण करावे असे पुरुषार्थ चिन्तामणीत सांगितले आहे.

चातुर्मास्यव्रत

द्वादशीला पारणे केल्यावर संध्याकाळी पूजा करून चातुर्मास्य व्रताचा संकल्प करावा; असे कौस्तुभात सांगितले आहे. हा संकल्प एकादशीलाच करावा असे निर्णयसिन्धु म्हणतो. चातुर्मास्यव्रताचा आरंभ अगदी पहिल्यानेच जर करणे असेल, तर-गुरुशुक्रांचे अस्तादिक, सुतक, सोयर वगैरे प्रसंगी तो करू नये. दुसर्यांदा वगैरे जर आरंभ करणे असेल तर अस्तादिक व अशौचादिक यामध्येहि करायला हरकत नाही. चातुर्मास्यव्रत शैवादिकांनीहि करावे.

चातुर्मस्यव्रतग्रहण

जाई जुई वगैरेंच्या फुलांनी भगवन्ताची महापूजा करून,

'सुप्ते त्वयि जगन्नाथे जगत्सुप्तं भवेदिदम् । विबुद्धे त्वयि बुध्येत प्रसन्नोमे भवाच्युत॥

अशी प्रार्थना करावी आणि विष्णूच्या पुढे हात जोडून उभे राहून

'चतुरो वार्षिकाम् मासान् देवस्योत्थापनाविधि । श्रावणे वर्जये शाकं दधि भाद्रपदे तथा ॥

दुग्धमाश्वयुजेमासि कार्तिके द्विदलं तथा । इम करिष्ये नियमं निर्विघ्नं कुरु मेऽच्युत ॥

इदं व्रतं मया देव गृहीतं पुरातस्तव । निर्विघ्नं सिद्धिमायातु प्रसादात्ते रमापते ॥

गृहीतेऽस्मिन्व्रते देवं पंचत्वं यदि ये भवेत् । तदा भवतु सम्पूर्णं प्रसादात्ते जनार्दन ॥'

या मंत्रानी प्रार्थना करावी व देवाला शंखांनी अर्घ्य द्यावे. या मंत्रात सांगितलेली जी श्रावणात पालेभाजी वर्ज्य, भाद्रपदात दही वर्ज्य, आश्विनात दूध वर्ज्य व कार्तिकात द्विदलधान्य वर्ज्य - ही व्रते ती नित्य आहेत. हविष्यादि इतर व्रते करण्याची जर इच्छा असेल, तर 'श्रावणे वर्जये शाकं' वगैरे श्लोकांच्या जागी

'हविष्यान्न भक्षयिष्ये देवाहं प्रीतये तव।'

असा श्लोक म्हणावा. शाकव्रत आणि इतर व्रते जर एकदमच करण्याची इच्छा असेल, तर शाकव्रताचा मंत्र म्हणून, इतर व्रतांचाही म्हणावा. त्याचप्रमाणे जर गूळ सोडायचा असेल व धारणा पारणा करणे असेल तर त्याबाबतीत पुढीलप्रमाणे उच्चार करावा -

'वर्जयिष्ये गुडं देव मधुरस्वरसिद्धये । वर्जयिष्ये तैलमहं सुंदरांगत्वसिद्धये ॥

योग्याभ्यासी भविष्यामि प्राप्तंब्रह्मपदंपरम् । मौनव्रती भविष्यामि स्वाज्ञापालनसिद्धये ॥

एकान्तरोपवासीच प्राप्तुं ब्रह्मपदं परम् ॥'

सर्वच निषिद्ध पदार्थ जर वर्ज्य करायचे असतील, तर 'वृन्ताकादि निषिद्धानि हरे सर्वाणि वर्जये' असा संकल्प करावा.

चातुर्मास्यातले निषिद्ध पदार्थ

प्राण्यांच्या हाडांचा चुना, कातड्याच्या पिशवीतले पाणी, ईडनिंबू, महाळुंग, वैश्वदेव न झालेले अन्न, विष्णुला अर्पण न केलेले अन्न, करपलेले अन्न, मसुरा व मांस- ही आठ आमिषे आहेत, ती सर्व वर्ज्य करावीत. पांढरे पावटे, काळे वाल, घेवडा, चवळी, लोणची, वांगी, कलिंगड, पुष्कळ बीजांचे फळ, मुळीच बिया नसलेले फळ, तांबडा मुळा, पांढरा मुळा, कोहळा, ऊस, नवी बोरे, आवळे, चिंच, पलंगादिकांवर निजणे, ऋतुकालावाचून हवा तेव्हा स्त्रीसंग करणे, परान्न, मध, पडवळ, उडीद, हुलगे (कुळीथ) आणि पांढर्या मोहर्या ही सर्व वर्ज्य करावीत. वांगी, बेलफळे, उंबरे, कलिंगड व करपलेले अन्न- हे पदार्थ वैष्णवांनि अक्षयीच वर्ज्य करावेत. गाय, म्हैस व शेळी यांच्या दुधावाचून इतर प्राण्यांचे दूध, शिळे अन्न, ब्राह्मणापासून विकत घेतलेले रस, जमीनीपासून तयार झालेले मीठ, तांब्याच्या भांड्यातले गाईचे दूध, साचलेले पाणी, स्वतःकरताच केवळ तयार केलेले अन्न -हे सर्व पदार्थ आमिषगणात येतात असे इतर ग्रंथात सांगितले आहे. चातुर्मास्यांत हविष्यान्न खाणार्याला

पाप लागत नाही. तांदूळ, मूग, यव, तीळ, कांग, राळे, वाटाणे, सांवे, गहू, पांढरा मुळा, सुरण, सैंधव, समुद्रापासून केलेले मीठ, गाईचे दही-दूध-तूप, फणस, आंबा, नारळ, हिरडा, पिंपळी, जिरे, सुंठ, चिंच, केळे, आवळे, राय आवळे (हरपररेवडी) गुळाखेरीज उसाचा इतर पदार्थ (साखर) ही सर्व तेलात जर तळलेली नसतील, तर हविष्ये जाणावीत. गाईचे ताक व म्हशीचे तूप हीही क्वचित ठिकाणी हविष्ये सांगितली आहेत.

काम्यव्रते

गूळ खाणे सोडल्यास स्वर मधुर होतो. तेल सोडल्यास अंगकान्ति सुंदर होते. योगाभ्यासाने ब्रह्मप्राप्तहोते. विडा खाणे सोडल्यास भोगप्राप्ति होते व कंठ गोड होतो. तूप सोडल्यास शरीर मऊ होते. पालेभाजी सोडल्यास पक्वान्न मिळते. पायांना अभ्यंग लावणे सोडल्यास अंगाला सुगंध येतो. दही, दूध व ताक ही वर्ज्य केल्यास विष्णुलोक मिळतो. थाळ्यात

शिजविलेले अन्न सोडल्यास वंश वाढतो. जमिनीवर दर्भ अंथरून त्यावर निजल्यास विष्णुभक्त होतो. जमिनीवर जेवल्याने राज्य मिळते. मधु (सुरा) व मांस यांचा त्याग केल्याने मुनिपणा येतो. एकदिवसाड जेवण केल्याने ब्रह्मलोक मिळतो. नखे व केस राखल्याने रोज गंगास्नानाचे फळ मिळते. मुकेपणा राखल्याने आज्ञाभंग होत नाही. विष्णूला नमस्कार केल्याने गोदानाचे फळ मिळते. विष्णूच्या पायांना स्पर्श करणारा कृतकृत्य होतो. विष्णूच्या देवळात सडासंमार्जन केल्याने राजेपणा मिळतो. शंभर प्रदक्षिणांनी विष्णुलोक मिळतो. एकवेळ जेवल्याने अग्निहोत्राचे फळ मिळते. अयाचित भोजनाने विहीर व गुहा यांची स्वच्छता केल्याचे फळ मिळते. दिवसाच्या सहाव्या भागात जेवण केल्यास अक्षय स्वर्ग मिळतो. पानावर जेवण केल्याने कुरुक्षेत्री राहिल्याचे फळ मिळते. दगडाच्या चिपेवर जेवण केल्याने प्रयागस्नानाचे फळ मिळते. याप्रमाणे चार महिनेपर्यंत करण्यास कठीण नसलेल्या (साध्य) व्रतांचा संकल्प, एकादशीला अथवा द्वादशीला करून, त्याच दिवशी

श्रावणातल्या विशेषव्रतांचा संकल्प पुढील प्रमाणे करावा-

'अहंशाकं वर्जयिष्ये श्रावणे मासि माधव' वगैरे. या ठिकाणी शाक या शब्दाचा अर्थ- फळ, मूळ, पुष्प, पान, अंकुर, कांड, साली वगैरे जो लोकप्रसिद्ध तोच घ्यायचा. केवळ तोंडी लावण्याच्या ज्या भाज्या त्याच असा संकुचित अर्थ 'शाक' या शब्दाचा येथे घ्यायचा नाही; म्हणून वरील सर्व वस्तु वर्ज्य कराव्या. सुंठ, हळद, जिरे वगैरेहि वर्ज्यच होत. त्या काळात उत्पन्न झालेल्या अथवा पूर्वी उत्पन्न होऊन वाळवून ठेवलेल्या सर्व भाज्या (शाका) वर्ज्य कराव्या.

तप्तमुद्रा

शयनी आणि बोधिनी या एकादश्यांना तप्तमुद्रा धारण कराव्या असे रामार्चन चंद्रिका नावाच्या ग्रंथात सांगितले आहे. तप्तमुद्रा धारण करण्याच्या बाबतीत प्रशंसापर अशी विधिवाक्ये व निंदापर अशी

निषेधार्थक वाक्ये पुष्कळ आढळतात म्हणून, याबाबतीत शिष्टाचाराप्रमाणे व्यवस्था जाणावी. ज्यांच्या कुळात-बाप, आजा वगैरेंनी तप्तमुद्रा घेण्याचा धर्म स्वीकारला असेल, त्यांनी तो तसाच पुढे चालवावा. ज्यांच्या कुळात कोणीही तप्तमुद्रा घेतल्या नसतील, त्यांनी तसे करण्यात दोष सांगितला आहे; म्हणून केवळ स्वतःच्या बुद्धीच्या जोरावर तसे कर्म करू नये.

कोकिळाव्रत

आषाढ शुद्ध द्वादशीला वामनाची पूजा करावी, म्हणजे नरमेधाचे फळ मिळते. पूर्वाषाढा नक्षत्राने युक्त अशा पुनवेला अन्नपानादिकांचे दान केल्यास अक्षय्य अन्नपानादि मिळतात. पुनवेला श्रीशिवाचा शयनोत्सव करावा. या कर्माला जी पुनव घेणे ती प्रदोषकाळची घ्यावी. याच पुनवेला कोकिळाव्रत करावे.

'स्नानं करिष्ये नियता ब्रह्मचर्ये स्थिता सती । भोक्ष्यामि नक्त भुशय्यां करिष्ये प्राणिनां दयाम् ॥'

असा एक महिन्यापर्यंतचा व्रताचा संकल्प करून, कोकिळारूपी शिवादेवीची पूजा करावी आणि रात्री जेवण करावे. ज्यावर्षी अधिक आषाढ असेल त्या वर्षी हे व्रत करावे. शुद्ध आषाढांत करण्यास कोठेच शास्त्राधार नाही. आषाढ किंवा श्रावण या महिन्यातल्या पुनव, चतुर्दशी किंवा अष्टमी या तिथींवर शिवाचे पवित्रारोपण करावे. आषाढी पुनवेला संन्याशांनी क्षौर करून, चार महिने एकाच जागी राहाण्याचा संकल्प करावा आणि व्यासपूजा करावी, असे सांगितले आहे. या कामासाठी सूर्योदयापासून तीन मुहूर्तपर्यंत असणारी पुनव घ्यावी. चातुर्मास्यांत संन्याशाने (गति) क्षौर करु नये. चार अथवा दोन महिने एकाच जागी रहावे.

व्यासपूजाविधि

आधी क्षौर करून नंतर बारा वेळा मातीची स्नाने व प्राणायाम हा विधि करुन व्यासपूजा करावी. या

पूजेचा विधि संक्षेपाने सांगतो. देशकालादिकांचा उच्चार करून,

'चातुर्मास्यवाससंकल्पं कर्तु श्रीकृष्णव्यासभाष्यकाराणां सपरिवाराणां पूजनं करिष्ये'

असा संकल्प करावा. मध्ये श्रीकृष्ण व त्याच्या पूर्वदिशेकडून प्रदक्षिणेच्या वळणाने- वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न आणि अनिरुद्ध यांचे आवाहन करावे. या श्रीकृष्णादि पाच देवतांच्या दक्षिणभागी व्यास व त्यांच्या पूर्वेकडून प्रदक्षिणाक्रमाने-सुमंतु, जैमिनि, वैशंपायन व पैल अशा व्यासपंचकाचे आवाहन करावे. श्रीकृष्णादि देवतांच्या डाव्या बाजूला भाष्यकार श्रीमच्छंकराचार्य आणि त्यांच्या पूर्वदिशेकडुन प्रदक्षिणाक्रमाने पद्मपाद, विश्वरूप, त्रोटक व हस्तामलक या आचार्यांचे आवाहन करावे. श्रीकृष्णादि देवतापंचकात श्रीकृष्णाच्या दोन बाजूस ब्रह्मा आणि रुद्र, पूर्व वगैरे चार दिशांस- सनक, सनंदन, सनातन आणि सनत्कुमार; आणि पुढे-गुरु, परमगुरु, परमेष्ठिगुरु, ब्रह्मा, वसिष्ठ, शक्ति, पराशर, व्यास, शुक, गौडपाद,

गोविन्दपाद, शंकराचार्य व इतर ब्रह्मनिष्ठ यांचे आवाहन करावे. या तिन्ही पंचकांच्या आग्नेयीस - गणपति, ईशान्येस क्षेत्रपाल, वायव्येस दुर्गा, नैऋत्येस सरस्वती आणि पूर्व वगैरे आठ दिशांत इंद्रादिक लोकपाल यांचे आवाहन करून, त्यांची पूजा करावी. नारायणाच्या आठ अक्षरी मंत्राने त्यातल्या श्रीकृष्णाची पूजा करून, इतरांची-प्रणवपूर्वक 'नमोन्त' अशी त्यांची नावे घेऊन, त्यांच्या नाममंत्रानी (पूजा) करावी. काही आडकाठी नसल्यास,पूजेनंतर 'चतुरो वार्षिकान्यासानिह वसामि' असा मनात संकल्प करावा आणि

'अहं तावन्निवत्स्यामि सर्वभूतहिताय वै । प्रायेन प्रावृषि प्राणिसंकुलं वर्त्म दृश्यते अतस्तेशमहिंसार्थ पक्षान्वै श्रुतिसंश्रयान् । स्थास्यामश्चतुरो मासानत्रैवासति बाधके।'

असा तोंडाने संकल्प करावा. त्यानंतर गृहस्थांनी

'निवसन्तु सुखेनात्र गमिष्यामः कृतार्थताम् ।
यथाशक्तिच शुश्रूषां करिष्यामो वयं मुदा ॥'

असे सांगावे. त्यानंतर गृहस्थांनी अधिक वयोमानाप्रमाणे असणार्या यतींना आणि यतींनी परस्पराना नमस्कार करावा. हा विधि जर पुनवेला करणे अशक्य झाले तर द्वादशीला करावा.
आषाढकृष्ण द्वितीयेला अशून्यशयनव्रत करावे. या व्रतात लक्ष्मीसह विष्णूची पलंगावर पूजा करून,

'पत्नीभर्तुर्वियोग च भर्ताभार्यासमुद्भवम् । नाप्नुवन्ति यथा दुःखं दम्पत्यानि तथा कुरु ॥'

असा मंत्र म्हणून नवराबायकोचा विरह न करण्यासाठी प्रार्थना करावी. त्यानंतर चंद्राला अर्घ्य देऊन नक्तभोजन करावे. याप्रमाणे चार महिनेपर्यंत प्रत्येक वद्य द्वितीयेला पूजा करून, बायको असलेल्या ब्राह्मणाला शय्यादान द्यावे आणि सर्व सामुग्रीसह प्रतिमेचे दान करावे. हे व्रत केल्याने सात जन्मपर्यंत अक्षय्य असे दाम्पत्यसुख, पुत्रधनादिकांचा अक्षय्य लाभ व सन्तत गृहस्थाश्रम यांची प्राप्ति होते. या व्रताला चंद्रोदयाने व्यापलेली तिथि घ्यावी; कारण, पूजा वगैरे सर्व काही चंद्रोदयानंतर करावी, असे या

बाबतीत सांगितले आहे. द्वितीया जर दोन दिवस चंद्रोदयव्यापिनी असली अथवा दोन्ही दिवशी तशी नसली, तर दुसर्या दिवसाची घ्यावी.

निर्णयसिंधु नुसार चातुर्मास

चातुर्मास्यव्रत

अत्रैवचातुर्मास्यव्रतारंभउक्तोभारते
आषाढेतुसितेपक्षेएकादश्यामुपोषितः
चातुर्मास्यव्रतंकुर्याद्यत्किंचिन्नियतोनरइति
अस्यनित्यत्वंतत्रैवोक्तम्
वार्षिकांश्चतुरोमासान्वाहयेत्केनचिन्नरः
व्रतेननोचेदाप्नोतिकिल्बिषंवत्सरोद्भवम्
असंभवेतुलार्केपिकर्तव्यंतत्प्रयत्नतइति
तेनाषाढशुक्लैकादश्यांद्वादश्यांपौर्णमास्यांव
समाप्तिस्तुकार्तिकशुक्लद्वादश्यामेवतदुक्तंहेम
चतुर्धागृह्यवैचीर्णंचातुर्मास्यव्रतंनरः

कार्तिकेशुक्लपक्षेतुद्वादश्यांतत्समापयेदिति अस्यारंभः
शुक्रास्तादावपिकार्यः
नशैशवंनमौढ्यंचशुक्रगुर्वोर्नवातिथेः
खंडत्वंचिंतयेदादौचातुर्मास्यविधौनरइतिहेमाद्
इदंचद्वितीयाद्यारंभविषयम् प्रथमारंभस्तुनभवत्येव
आशौचमध्येपिद्वितीयाद्यारंभोभवति
अशुचिर्वाशुचिर्वापियदिस्त्रीयदिवापुमान् व्रतमेतन्नरः
कृत्वामुच्यतेसर्वपातकैरितिभार्गवार्चनदीपिक
आरब्धेसूतकंनस्यादनारब्धेतुसूतकमितिविष्णुवचन
यत्तुअसंक्रांतंतथामासंदैवेपित्र्येचकर्मणि
मलमासमशौचंचवर्जयेन्मतिमान्नरइतिहेमाद्रौ
चातुर्मास्यव्रतप्रकरणेभविष्यवचनं
तत्पूषानुमंत्रणमंत्रवदसंबद्धंमध्येपठितमितिज्ञेयं
अन्यथापित्र्यस्यपूर्वोक्तस्यविवाहादेश्चचातुर् प्रसंगः
प्रकरणनिवेशेपिवाप्रथमारंभविषयंज्ञेयं
केचित्तुप्रतिवर्षंचातुर्मास्यव्रतप्रयोगानांभिन् तन्न
प्रतिवर्षंचयः कुर्यादेवंवैसंस्मरन्हरिं
देहांतेऽतिप्रदीप्तेनविमानेनार्कवर्चसा
मोदतेविष्णुलोकेसौयावदाभूतसंप्लवमितिहेमाद् ।

ह्या एकादशीसच चातुर्मास्यव्रतांचा आरंभ सांगतो. भारतांत - “ आषाढशुक्लपक्षीं एकादशीस उपोषण करुन कोणत्याही चातुर्मास्यव्रताचा आरंभ नियमित होऊन मनुष्यानें करावा. ” चातुर्मास्यव्रत नित्य आहे, असें तेथेंच सांगतो - “ वार्षिक (वर्षाकालाचे) चार महिने कोणत्याही व्रतानें घालवावे. असें न करील तर त्या मनुष्यास संवत्सराचें पाप लागतें. चार महिने व्रत न होईल तर तूलसंक्रांतीस सूर्य असतांही तें व्रत यत्नानें करावें. ” यावरुन आषाढशुक्ल एकादशी, द्वादशी, किंवा पौर्णिमा यांचे ठायीं आरंभ करावा. आणि समाप्ति तर कार्तिकशुक्ल द्वादशीसच करावी; तें सांगतो. हेमाद्रींत भारतांत - “ मनुष्यानें चातुर्मास्यव्रत चार प्रकारचें (श्रावणांत शाक, भाद्रपदांत दहीं, आश्विनांत दूध, कार्तिकांत द्विदल हें वर्जनरुप) ग्रहण करुन आचरण केलेलें तें कार्तिकशुक्ल द्वादशीस समाप्त करावें. ” चातुर्मास्यव्रताचा आरंभ गुरुशुक्रांच्या अस्तादिकांतही करावा. कारण, “ शुक्र व गुरुचें शिशुत्व, अस्त व खंडातिथि यांचा विचार चातुर्मास्यव्रताचे आरंभाविषयीं मनुष्यानें करुं नये ”

असें हेमाद्रींत वृद्धगार्ग्याचें वचन आहे. हें वचन दुसर्या वगैरे आरंभाविषयीं होय. प्रथमारंभ तर होत नाहींच. आशौचामध्येंही दुसर्या वर्षीं वगैरे व्रतारंभ होतो. कारण “ स्त्री किंवा पुरुष अशुचि किंवा शुचि असेल तथापि त्यानें हें व्रत केलें असतां सर्व पातकांपासून मुक्त होतो ” असें भार्गवार्चनदीपिकेंत स्कांदवचन आहे. आणि प्रारंभ केलेल्याविषयीं सूतक नाहीं, आरंभ केला नसेल तर त्याविषयीं सूतक दोष होतो ” असें विष्णुवचनही आहे. आतां जें “ दैवपित्र्यकर्मांचे ठायीं मलमास व अशौच वर्ज्य करावीं, म्हणजे मलमासांत व आशौचांत दैवपित्र्यकर्म करुं नये. ” असें हेमाद्रींत चातुर्मास्यव्रतप्रकरणीं भविष्यवचन आहे तें पूषानुमंत्रण मंत्रासारखें असंबद्ध मध्यें पठित आहे, असें जाणावें. असंबद्ध म्हटलें नाहीं तर हेमाद्रींत पूर्वोक्त पित्र्यकर्म व विवाह यांचा चातुर्मास्यव्रतामध्यें काय प्रसंग आहे ? अथवा चातुर्मास्यव्रतप्रकरणांत तें वचन सुसंबद्ध मानिलें तरी प्रथमारंभविषयक जाणावें. केचित् विद्वान् तर प्रतिवर्षीं चातुर्मास्यव्रतप्रयोग भिन्न भिन्न असल्यामुळें दुसर्या वर्षीं आशौचादि प्राप्त असतां

द्वितीयादिप्रयोग (द्वितीयादिव्रतारंभ) होतच नाहीं असें म्हणतात. तें बरोबर नाहीं; कारण, “ प्रतिवर्षी हरीचें स्मरण करुन असें जो व्रत करील तो देहांतीं सूर्यासारख्या तेजस्वी अशा विमानांत बसून कल्पपर्यंत विष्णुलोकीं आनंद पावतो. ” असें हेमाद्रींत भविष्यवचन आहे. यावरुन द्वितीयादि आरंभ अवश्य आहे. आतां हा विस्तार राहूं दे.

इदंचशिवभक्तादिभिरपिकार्यं
शिवेवाभक्तिसंयुक्तोभानौवागणनायके
कृत्वाव्रतस्यनियमंयथोक्तफलभाग्भवेदितिब्रह्म
व्रतग्रहणप्रकारस्तुहेमाद्रौभविष्ये महापूजांततः
कुर्याद्देवदेवस्यचक्रिणः
जातीकुसुममालाभिर्मंत्रेणानेनपूजयेत्
सुप्तेत्वयिजगन्नाथेजगत्सुप्तंभवेदिदं
विबुद्धेचविबुद्ध्येतप्रसन्नोमेभवाच्युत
एवंतांप्रतिमांविष्णोः पूजयित्वास्वयंनरः
प्रभाषेताग्रतोविष्णोः कृतांजलिपुटस्तथा
चतुरोवार्षिकान्मासान्देवस्योत्थापनावधि
इमंकरिष्येनियमंनिर्विघ्नंकुरुमेच्युत

इदंव्रतंमयादेवगृहीतंपुरतस्तव
निर्विघ्नंसिद्धिमायातुप्रसादात्तवकेशव
गृहीतेस्मिन्व्रतेदेवपंचत्वंयदिमेभवेत्
तदाभवतुसंपूर्णंत्वत्प्रसादाज्जनार्दन
गृहीतेस्मिन्व्रतेदेवयद्यपूर्णेमृतोह्यहं
तन्मेभवतुसंपूर्णंत्वत्प्रसादाज्जनार्दनेति ।

हें चातुर्मास्यव्रत शिवभक्तादिकांनींहीं करावें. कारण, “ शिव किंवा सूर्य अथवा गणपति यांचे ठायीं भक्तियुक्त असलेला मनुष्य व्रतनियम करील तर यथोक्त फल पावेल. ” असें ब्रह्मवैवर्तांत वचन आहे. व्रतग्रहणाचा प्रकार तर हेमाद्रींत भविष्यपुराणांत सांगतो -
“ देवांचाही देव असा जो विष्णु त्याची महापूजा करुन जाईच्या पुष्पमालांनीं पुढें सांगितलेल्या मंत्रानें पूजा करावी. ” तो मंत्र - “ सुप्ते त्वयि जगन्नाथे जगत्सुप्तं भवेदिदम् ॥ विबुद्धे च विबुद्ध्येत प्रसन्नो मे भवाच्युत ॥ ” या मंत्रानें त्या विष्णुप्रतिमेची पुरुषानें स्वतः पूजा करुन हात जोडून विष्णूच्या पुढें प्रार्थना करावी. ती अशी - “ चतुरो वार्षिकान् मासान् देवस्योत्थापनावधि ॥ इमं करिष्ये नियमं निर्विघ्नं कुरु मेऽच्युत ॥ इदं व्रतं

मया देव गृहीतं पुरस्तव ॥ निर्विघ्नं सिद्धिमायातु प्रसादात्तव केशव ॥ गृहीतेस्मिन्व्रते देव पंचत्वं यदि मे भवेत् ॥ तदा भवतु संपूर्णं त्वत्प्रसादाज्जनार्दन ॥ गृहीतेस्मिन् व्रते देव यद्यपूर्णे मृतो ह्यहं ॥ तन्मे भवतु संपूर्णं त्वत्प्रसादाज्जनार्दनेति ॥ ”

तत्रभार्गवार्चनदीपिकायांनृसिंहपरिचर्यायां
श्रावणेवर्जयेच्छाकंदधिभाद्रपदे तथा
दुग्धमाश्वयुजेमासिकार्तिकेद्विदलंत्यजेदिति
स्कांदेपिचातुर्मास्यकल्पे
चत्वार्येतानिनित्यानिचतुराश्रमवर्णिनां
प्रथमेमासिकर्तव्यंनित्यंशाकव्रतंनरैः
द्वितीयेमासिकर्तव्यंदधिव्रतमनुत्तमं
पयोव्रतंतृतीयेतुचतुर्थेपिनिशामय
द्विदलंबहुबीजंचवृतांकंचविवर्जयेत्
नित्यान्येतानिविप्रेंद्रव्रतान्याहुर्मनीषिणः
जंबीरंराजमाषांश्चमूलकंरक्तमूलकं
कूष्मांडंचेक्षुदंडंचचातुर्मास्येत्यजेद्बुधः तथा
विशेषाद्बदरींधात्रींकूष्मांडंतिंतिणींत्यजेत्
जीर्णधात्रीफलंग्राह्यंकथंचित्कायशोधनमिति
तीर्थसौख्येस्कांदे वार्षिकांश्चतुरोमासान्प्रसुप्तेवैजनार्दने

मंचखट्वादिशयनंवर्जयेद्भक्तिमान्नरः
अनृतौवर्जयेद्भार्यांमांसंमधुपरौदनं
पटोलंमूलकंचैववृंताकंचनभक्षयेत्
अभक्ष्यंवर्जयेद्दूरान्मसूरंसितसर्षपं
राजमाषान्कुलित्थांश्च आशुधान्यंचसंत्यजेत्
शाकंदधिपयोमाषान् श्रावणादिषुसंत्यजेत् अत्र
त्यजेदितिवर्जनसंकल्परुपः पर्युदासोज्ञेयः व्रतोपक्रमात्
।

चातुर्मास्यव्रतांविषयीं भार्गवार्चनदीपिकेंत नृसिंहपरिचर्यैत भविष्यांत - " श्रावणमासीं शाक (भाजी), भाद्रपदांत दधि, आश्विनांत दुग्ध, कार्तिकांत द्विदल (दोन डाळीचा) हीं सोडावीं. " स्कांदांतही चातुर्मास्यकल्पांत - " चार वर्णांच्या चारी आश्रमांतल्या मनुष्यांस हीं चार व्रतें नित्य होत. तीं अशीं - मनुष्यांनीं पहिल्या महिन्यांत नित्य शाकव्रत करावें. दुसर्या महिन्यांत उत्तम दधिव्रत करावें. तिसर्या महिन्यांत पयोव्रत करावें. चवथ्यांतही सांगतों, श्रवण कर - द्विदल, बहुबीज, वृंताक हीं वर्ज्य करावीं. हीं व्रतें नित्य होत असें विद्वान् म्हणतात. जंबीर, राजमाष

(चवळ्या) मुळा, रक्तमूलक, कूष्मांड, इक्षुदंड हीं चातुर्मास्यांत वर्ज्य करावीं. तसेंच विशेषेंकरुन बोर, आंवळा, कूष्मांड, चिंच, हीं वर्ज्य करावीं. परंतु जुने आंवळे देहशोधनार्थ कांहीं घ्यावे. ” तीर्थसौख्यांत स्कंदपुराणांत - “ वार्षिक चार महिन्यांत जनार्दन निजला असतां मंचक, खट्वा इत्यादिकांवर शयन भक्तिमान् मनुष्यानें वर्ज्य करावें. ऋतुकाला (रजोदर्शनापासून १६ दिवस) वांचून स्त्रीगमन वर्ज्य करावें. मांस, मध, परान्न, पडवळ, मुळा, वांगें हीं भक्षण करुं नयेत. अभक्ष्य पदार्थ मसूरा, पांढरे सर्षप (मोहर्या) हे अत्यंत सोडावे. चवळ्या, कुलित्थ, आशुधान्य (तुषधान्य) हीं सोडावीं. शाक, दधि, पय, माष हीं श्रावणादि चार मासांत वर्ज्य करावीं. ” येथें वर्जन करणें हें व्रत असल्यामुळें ‘ त्यजेत् ’ हा वर्जनसंकल्परुप निषेध जाणावा.

अत्रकेचिच्छाकाख्यंपत्रपुष्पादीत्यमरकोशस्यश इतिक्षीरस्वामिनाव्याख्यानात् व्यंजनमात्रस्यनिषेधमाचक्षते अन्येतुशाकशब्दस्यपत्रादिदशविधशाकेयोगरुढत्व

योगाच्चरुढेर्बलीयस्त्वात्सूपादीनामपित्यागा तेन
मूलपत्रकरीराग्रफलकांडाधिरुढकाः
त्वक्पुष्पंकवचंचेतिशाकंदशविधंस्मृतं
इतिक्षीरस्वामिनोक्तस्यशाकस्यनिषेध इति अधिरुढक
अंकुरः वस्तुतस्तु तत्तत्कालोद्भवाः शाकावर्जनीयाः
प्रयत्नतः
बहुबीजमबीजंचविकारिचविवर्जयेदितिभविष्य
अत्रतत्कालोद्भवजातीयत्वंविवक्षितं
तेनातपादिशोषितानांवर्षांतरोद्भवानामपिन
अत्रतत्कालोद्भवत्वमात्रंविवक्षितंनतुतन्मात्र
इतिनिष्कर्षः बहुबीजमित्यनेकबीजमितिकेचित्
इतरावयवापेक्षयाबीजावयवायत्रबहवस्तदित्यन्
अबीजंकदलादि वस्तुतस्तु
इदंमहानिबंधेश्वभावान्निर्मूलमेव आचारप्रदीपे
वृंताकंचकलिंगंचबिल्वौदुबरभिः सटाः
उदरेयस्यजीर्यंतितस्यदूरतरोहरिः तथापरार्केदेवलः
ब्रह्मचर्यंतथाशौचंसत्यमामिषवर्जनं
व्रतेष्वेतानिचत्वारिवरिष्ठानीतिनिश्चयः ॥

येथें कोणी ग्रंथकार ' शाकाख्यं पत्रपुष्पादि ' असें
अमरांत आहे त्याची व्याख्या ' शक्यतेऽशितुं अनेन '

म्ह० ज्यानें भोजन करण्यास शक्य होतें तें शाक अशी क्षीरस्वामीनें केली आहे म्हणून भोजनसमयीं तोंडास लावण्याच्या सर्व चटणी कोशिंबरी भाज्या यांचा निषेध करितात. इतर विद्वान् मूल पत्र इत्यादि पुढें सांगावयाच्या दहा प्रकारच्या शाकांचेठायीं शाकशब्द योगरुढ आहे, व योगापेक्षां (व्युत्पत्तीपेक्षां) रुढी बलवत्तर असल्यामुळें; आणि असें न केलें तर वरण इत्यादिकांचाही त्याग प्राप्त होत असल्यामुळें वरील मताचा त्याग करितात. तेणेंकरुन असें सूचित होतें कीं, “ मूळ, पत्र, करीर (कोंब), अग्र, फल, कांड, अधिरुढक (मोड आलेलें धान्य), साल, पुष्प, कवच ह्या दहा प्रकारच्या शाका होत. ” ह्या क्षीरस्वामीनें सांगितलेल्या दशविध शाकांचा निषेध होय. वास्तविक म्हटलें तर - “ त्या त्या कालीं उत्पन्न ज्या शाका त्या प्रयत्नानें सोडाव्या. बहुबीज, वीजरहित व विकारी हीं सोडावीं ” ह्या भविष्यवचनावरुन त्या त्या कालीं उत्पन्न दशविध शाकांचा निषेध होय. येथें त्या कालीं उत्पन्न जातींच्या शाका वर्ज्य, असें असल्यामुळें पूर्ववर्षीं उत्पन्न असून उन्हानें सुकवून ठेविलेल्यांचाही निषेध

होतो. या वचनांत ‘ त्या कालीं उत्पन्न ’ इतकाच अर्थ करावयाचा आहे. ‘ त्याच कालीं उत्पन्न ’ असा नाहीं. कारण, तसा केला तर गौरव हा दोष येतो. यावरुन असा अर्थ केल्यानें त्या कालीं उत्पन्न होत असून इतर

कालीं होणार्या तोंडलीं इत्यादिकांचा निषेध होतो. या वचनांत ‘ तत्तत्कालोद्भवाः ’ म्हणजे ‘ त्या त्या कालीं उत्पन्न ’ अशी वीप्सा (द्विरुक्ति) असल्यामुळें आपापल्या कालीं उत्पन्न झालेल्या सर्वांचा निषेध हा सारांश समजावा. बहुबीज म्हणजे अनेक बीज असें कोणी म्हणतात. इतर अवयवांपेक्षां बीजावयव ज्यांत अधिक तें बहुबीज, असें अन्य म्हणतात. वस्तुतः पाहिलें तर हें वचन महानिबंधांत नसल्यामुळें तें निर्मूलच होय. आचारप्रदीपांत - “ वृंताक (वांगें), कलिंग, बिल्व, उंबर, भिःसटा (दग्धान्न) हीं ज्याच्या पोटांत जिरतात त्यास हरि दूर होतो. ” तसेंच अपरार्कांत देवल - “ ब्रह्मचर्य, शूचिर्भूतपणा, सत्यभाषण, आमिषवर्जन हीं चार, व्रतामध्यें वरिष्ठ होत हा निश्चय आहे. ”

आमिषानिचोक्तानिरामार्चनचंद्रिकायांपा

प्राण्यंगचूर्णंचर्मांबुजंबीरंबीजपूरकं
अयज्ञशिष्टमाषादियद्विष्णोरनिवेदितं
दग्धमन्नंमसूरंचमांसंचेत्यष्टधामिषं
रुच्यंतत्तद्देशलभ्यंसुप्तेदेवेविवर्जयेत् पाद्मे
कार्तिकमाहात्म्ये
गोछागीमहिषीदुग्धादन्यद्दुग्धादिचामिषं धान्येमसूरिकाः
प्रोक्ताअन्नंपर्यूषितंतथा द्विजक्रीतारसाः
सर्वेलवणंभूमिजंतथा
ताम्रपात्रस्थितंगव्यंजलंपल्वलसंस्थितं
आत्मार्थंपाचितंचान्नमामिषंतत्स्मृतंबुधैः तथा निष्पावान्
राजमाषांश्चमसूरंसंधितानिच
वृंताकंचकलिंगंचसुप्तेदेवेविवर्जयेत्
संधितानिलवणशाकादीनि ।

आमिषें सांगतो रामार्चनचंद्रिकेंत पद्मपुराणांत -
“ प्राण्यंगचूर्ण (शिंपीचा चुना), चर्मोदक (पखाल इत्यादिकांतलें उदक), जंबीर, बीजपूरक (महाळुंग), यज्ञशेष नसून विष्णूस निवेदित नाहीं तें माषादि अन्न, दग्धान्न, मसूरा, मांस हीं आठ प्रकारचीं आमिषें होत. आप आपल्या देशांत मिळणारा असा रुचकर पदार्थ

तोही देव निजला असतां वर्ज्य करावा. ” पद्मपुराणांत कार्तिकमाहात्म्यांत - “ गाय, बकरी, महिषी यांवांचून इतरांचें दुग्धादिक, व घान्यामध्यें मसूरा, पर्युषित अन्न, ब्राह्मणापासून विकत घेतलेले सर्व रस, भूमीपासून उत्पन्न झालेंलें मीठ, तांब्याच्या पात्रांत ठेवलेलें गाईचें दुग्धादि, पल्वलोदक, आपणासाठींच शिजवलेलें अन्न हीं अमिषें होत, असें विद्वान् सांगतात. ” तसेंच “ पावटे, चवळी, मसूरा, संधित (लोणचें वगैरे), वांगें, कलिंगडें हीं देव निद्रिस्थ असतां वर्ज्य करावीं. ”

तत्रैवविष्णुधर्मे चतुर्ष्वपीहमासेषुहविष्याशीनपापभाक्
हविष्याणितुपृथ्वीचंद्रोदयेभविष्ये
हैमंतिकंसितास्विन्नंधान्यंमुद्गायवास्तिलाः
कलायकंगुनीवारावास्तुकंहिलमोचिका
षष्टिकाकालशाकंचमूलकंके मुकेतरत् कंदः
सैंधवसामुद्रेगव्येचदधिसर्पिषी
पयोनुद्धृतसारंचपनसाम्रहरीतकी
पिप्पलीजीरकंचैवनागरंगंचतिंत्तिणी
कदलीलवलीधात्रीफलान्यगुडमैक्षवं
अतैलपक्वंमुनयोहविष्याणिप्रचक्षते इति

सितास्विन्नंअनूष्मपक्कं धान्यंचतंडुलाः
केमुकंकेमुताइतिप्राच्येषुप्रसिद्धः कंदः
कलायस्तुसतीनक इत्यमरः बटुरीइतिप्रसिद्धंधान्यं
मदनरत्नेप्येवं अगस्तिसंहितायां हैमंताद्युक्त्वा
नारीकेलफलंचैवकदलीलवलीतथा
आम्रमामलकंचैवपनसंचहरीतकी
व्रतांतरप्रशस्तंचहविष्यंमन्वतेबुधाः ।

तेथेंच विष्णुधर्मांत - “ चातुर्मास्यांत जो हविष्य भक्षण करील तो पापी होत नाहीं. ” हविष्यें सांगतो - पृथ्वीचंद्रोदयांत भविष्यांत - हेमंत ऋतूंत उत्पन्न झालेलें असून ऊष्म्यावांचून पक्क, धान्य (तंडुल), मूग, यव, तिल, कलाय (वाटाणे, मठरी), कांग, नीवार (देवभात), वास्तुक (बथुवा - चंदनबटुवा), हिलमोचिका (चाकवत), षष्टिका (साठें भात), कालशाक ( ), मुळा, केमुकेतरत् (केमुता असा प्राच्यदेशी प्रसिद्धकंद), सेंधेलोण, समुद्रमीठ, गाईचें दहीं व तूप, लोणी न काढलेलें दूध, फणस, आंबा, हरीतकी, पिंपळी, जिरें, नागरंग, चिंचा, केळें, लवलीफल, आंवळा, गुळावांचून इतर उंसाचे पदार्थ, हे

सारे तेलांत पक्क न केलेले असले म्हणजे हविष्य आहेत, असें मुनि सांगतात. ” मदनरत्नांतही असेंच सांगितलें आहे. अगस्तिसंहितेंत - हैमंतिकं० ’ हें वरील वचन सांगून - “ नारीकेलफळ, केळें,

लवली ( ), आंबा, आंवळा, फणस, हरीतकी, आणि अन्यव्रतांत प्रशस्त तीं, यांस पंडित हविष्यें मानितात.

अन्यायपिव्रतान्युक्तानिहेमाद्रौभविष्ये
स्त्रीवानरोवामद्भक्तोधर्मार्थंसुदृढव्रतः
गृह्णीयान्नियमानेतान्दंतधावनपूर्वकान्
तेषांफलानिवक्ष्यामितत्कर्तृणांपृथक् पृथक्
मधुरस्वरोभवेद्राजापुरुषोगुडवर्जनात्
तैलस्यवर्जनाद्राजन्सुंदरांगः प्रजायते
कटुतैलपरित्यागाच्छत्रुनाशः प्रजायते
योगाभ्यासीभवेद्यस्तुसब्रह्मपदमाप्नुयात्
तांबूलवर्जनाद्भोगीरक्तकंठश्चजायते
घृतत्यागाच्चलावण्यंसर्वस्निग्धतनुर्भवेत्
शाकपत्राशनाद्भोगीअपक्वादोऽमलोभवेत्
भूमौप्रस्तरशायीचविप्रोमुनिवरोभवेत्
एकांतरोपवासेनब्रह्मलोकेमहीयते

धारणान्नखरोम्णांचगंगास्नानफलंलभेत्
मौनव्रतीभवेद्यस्तुतस्याज्ञाऽस्खलिताभवेत्
भूमौभुंक्तेसदायस्तुसपृथिव्याः पतिर्भवेत्
प्रदक्षिणाशतंयस्तुकरोतिस्तुतिपाठकः
हंसयुक्तविमानेनसचविष्णुपुरंव्रजेत्
अयाचितेनप्राप्नोतिपुत्रान्धर्म्यान्विशेषतः
षष्ठान्नकालभोक्तायः कल्पस्थायीभवेदिति
पर्णेषुयोनरोभुंक्तेकुरुक्षेत्रफलंलभेत्
गुडवर्जीनरोदद्यात्तद्धृतंताम्रभाजनं
सहिरण्यंनरश्रेष्ठलवणस्याप्ययंविधिः
सुप्तेदेवेतुयोविष्णोः शिवस्यांगणमर्चयेत्
पंचवर्णैस्तुयोनित्यंस्वस्तिकैः पद्मकैस्तथा
सयातिरुद्रलोकंहिगाणपत्यमवाप्नुयात्
अथैषांसमाप्तौकार्तिक्यांदानानि
एकभक्तव्रतेदंपतीसंपूज्यधेनुर्देया नक्तेवस्त्रयुगम्
एकांतरोपवासेगौः भूशयनेशय्या षष्ठकालभोजनेगौः
व्रीहिगोधूमादित्यागेहैमव्रीह्यादि कृच्छ्रेगोयुग्मं
शाकाशनेगौः पयोव्रतेच दधिमधुघृतव्रतेषुवासोगौश्च
ब्रह्मचर्येस्वर्णमूर्तिः तांबूलव्रतेवासोयुगं
मौनेघृतकुंभोवस्त्रयुगंघंटाच

देवाग्रेरंगमालिकाकरणेधेनुर्हेमपद्मंच
दीपिकाव्रतेदीपिकावासोयुगंच
भूमिभोजनेपर्णभोजनेचकांस्यपात्रंगौश्च
चतुष्पथदीपेगोग्रासेचगोवृषौ प्रदक्षिणाशतेवस्त्रं
अनुक्तेषुस्वर्णंगौश्चेत्यादिहेमाद्रौज्ञेयम् ।

इतरही व्रतें सांगतो हेमाद्रींत भविष्यांत - “ स्त्री किंवा पुरुष जो माझा भक्त त्यानें दृढव्रत होऊन दंतधावन करुन हे (पुढें सांगावयाचे) नियम ग्रहण करावे. ते ग्रहण करणारांस फळें निरनिराळीं सांगतो - गूळ वर्ज्य केल्यानें मधुरस्वरी राजा होतो. तेल वर्ज्य केल्यानें सुंदरांग होतो. कटुतैल वर्ज्य केल्यानें शत्रुनाश होतो. योगाभ्यास करील तो ब्रह्मपदातें प्राप्त होतो. तांबूल वर्ज्य केल्यानें नानाविध भोगप्राप्ति व रक्तकंठ होतो. घृत वर्ज्य केल्यानें लावण्ययुक्त व स्निग्धशरीर होतो. शाकपानें भक्षण करुन राहाणारा भोगी होतो. अपक्क खाणारा स्वच्छ होतो. भूमीवर किंवा प्रस्तरावर (दर्भांवर) निजणारा मुनिश्रेष्ठ ब्राह्मण होतो. एकांतरोपवासानें ब्रह्मलोकीं पूज्य होतो. नखें व रोम यांच्या धारणानें गंगास्नानाचें फल प्राप्त होतें. मौनव्रत

जो करतो त्याची आज्ञा अस्खलित चालते. भूमीवर निरंतर जो भोजन करतो तो पृथ्वीपति होतो. जो स्तुतिपाठ करीत विष्णूला शंभर प्रदक्षिणा करितो तो हंसयुक्त विमानांत बसून वैकुंठीं जातो. अयाचित भोजनानें धर्म्य (धर्मास हितकर) पुत्रांतें प्राप्त होतो. सहाव्या अन्नकालीं (दोन दिवस उपोषण करुन तिसर्या दिवशीं सायंकाळीं) जो भोजन करतो तो स्वर्गलोकीं चिरकाल राहतो. पानांवर जो मनुष्य भोजन करतो तो कुरुक्षेत्रफल पावतो. गूळ वर्ज्य करणार्यानें गुडपूर्ण ताम्रपात्र सुवर्णसहित द्यावें. मीठ वर्ज्य करणारानेंही सहिरण्य ताम्रपात्र द्यावें. देव निजला असतां पांचरंगी स्वस्तिकें व कमलें यांहींकरुन विष्णूचे किंवा शिवाचे अंगणाची पूजा करील तो रुद्रलोकीं जाऊन गाणपत्यातें पावेल. ” आतां या व्रतांच्या समाप्तीस कार्तिकीस दानें सांगतो - एकभुक्तव्रती यानें दंपत्याची पूजा करुन धेनु (गाय) द्यावी. नक्तव्रताचे ठायीं दोन वस्त्रें. एकांतरोपवासास गाय. भूशयनास शय्या. षष्ठकालभोजनास गाय. व्रीहि गोधूमादिकांच्या त्यागास सुवर्णव्री ह्यादिक. कृच्छ्रव्रत केलें तर दोन

गायी. शाकभक्षणास व पयोव्रतास गाय. दधि, मध, घृत यांच्या व्रतांस वस्त्र व गाय. ब्रह्मचर्यधारण केलें तर सुवर्णमूर्ति. तांबूलव्रतास दोन वस्त्रें. मौनव्रतास घृतकुंभ, दोन वस्त्रें, घंटा हीं द्यावीं. देवापुढें रंगमालिका करण्यास गाय व सुवर्णकमल. दीपिकाव्रतास दीपिका व दोन वस्त्रें. भूमिभोजनास व पर्णभोजनास कांस्यपात्र व गाय. चतुष्पथीं दीपदानास व गोग्रासास गाय व बैल. शतप्रदक्षिणाव्रतास वस्त्र. न सांगितलेल्या अन्यव्रतांविषयीं स्वर्ण व गोदान करावें, इत्यादि प्रकार हेमाद्रीवरुन जाणावा.

तथाचभार्गवार्चनदीपिकायांपाद्मे
शयनीबोधिनीमध्येशमीदूर्वापमार्गकैः
भृंगराजेनदेवांस्तुनार्चयीतकदाचन हेमाद्रौपाद्मे
आषाढादिचतुर्मासानभ्यंगंवर्जयेन्नरः
समाप्तौचपुनर्दद्यात्तिलतैलयुतंघटं
आषाढादिचतुर्मासंवर्जयेन्नखकृंतनं
वृंताकंगृंजनंचैवमधुसर्पिर्घटान्वितं
कार्तिक्यांतत्पुनर्हैमंब्राह्मणायनिवेदयेत्
अन्यान्यपिकेशकर्तनादिवर्जनसंकल्पानुरुपाणि

टोडरानंदेस्कांदे एकांतरंव्द्यंतरंवाकुर्यान्मासोपवासकं
अनोदनंफलाहारंनक्तव्रतमथापिवा ।

तसेंच भार्गवार्चनदीपिकेंत पद्मपुराणांत सांगतो -
“ शयनी व बोधिनी ह्या एकादशींमध्यें (चातुर्मासांत) शमी, दूर्वा, आघाडा, माका यांहींकरुन देवांचें पूजन कधींही करुं नये. ” हेमाद्रींत पद्मपुराणांत -
“ आषाढादि चार महिन्यांत मनुष्यानें अभ्यंग वर्ज्य करावा. त्याच्या समाप्तीस तिलतैलानें युक्त घट द्यावा. आषाढादिक चार महिने नखें काढणें, व वांगें, गाजर, मध, हीं वर्ज्य करावीं व त्याचे समाप्तीस सुवर्णाचा तो तो पदार्थ व घृतयुक्त घट ब्राह्मणास द्यावा. ” अन्यही केशकर्तनादिवर्जनव्रतें पृथ्वीचंद्रोदयावरुन जाणावीं. टोडरानंदांत स्कंदपुराणांत - “ एकांतरोपवास, दोन दिवसांच्या अंतरानें उपवास, मासोपवास, अनोदन, फलाहार, अथवा नक्तव्रत हीं करावीं. ”

अत्रैवतप्तमुद्राधारणमुक्तंरामार्चनचंद्रिकायांभ
शयन्यांचैवबोधिन्यांचक्रतीर्थेतथैवच
शंखचक्रविधानेनवह्निपूतोभवेन्नर इति
अतप्ततनूर्नतदामोअश्नुतेइतिऋग्वेदात्

सहोवाचयाज्ञवल्क्यस्तस्मात्पुमानात्महिताय सुश्लोकमौलेर्वर्माण्यग्निनासंदधत इतिशतपथश्रुतेः प्रतद्विष्णोअब्जचक्रेसुतप्तेजन्मांभोधीतर्तवेचर् मूलेबाह्वोर्दधन्येपुराणात्तुलिंगान्यंगेतप्तायुधा इतिसामवेदात् अग्निहोत्रंयथानित्यंवेदस्याध्ययनंयथा ब्राह्मणस्यतथैवेदंतप्तमुद्रादिधारणमितिपद्मपुर ब्राह्मणः क्षत्रियोवैश्यः शूद्रोवायदिवेतरः शंखमुद्रांकिततनुस्तुलसीमंजरीधरः गोपीचंदनलिप्तांगोदृष्टश्चेत्तदघंकृतः इतिकाशीखंडात् तत्प्रकारस्तुरामार्चनचंद्रिकातोज्ञेयः ।

याच एकादशीस तप्तमुद्राधारण सांगतो रामार्चनचंद्रिकेंत भविष्यांत - “ शयनी व बोधिनी एकादशीस तसेंच चक्रतीर्थांत शंखचक्रविधानेंकरुन मनुष्यानें अग्निपूत व्हावें. ” कारण, “ ज्याची तनु तप्त झाली नाहीं त्याला परमेश्वरप्राप्ति होत नाहीं ” असा ऋग्वेदमंत्र आहे. “ त्या याज्ञवल्क्यानें असें सांगितलें आहे कीं, पुरुषाने आत्महिताकरितां हरीचें भजन करावें. भगवंताचीं चिह्ने अग्नीच्या योगानें धारण करितात. ” अशी शतपथश्रुति आहे. “ श्रेष्ठ मनुष्य

अंगावर तप्त आयुधें अर्पण करणारे जन्मसागर तरण्याकरितां विष्णूचीं कमलचक्रें तापवून बाहुमूलाचे ठायीं धारण करितात. ” असा सामवेद आहे, आणि “ जसें अग्निहोत्र नित्य व वेदाध्ययन नित्य तसें तप्तमुद्रादिधारण ब्राह्मणाला नित्य आहे. ” असें पद्मपुराणवचनही आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, अथवा शूद्र किंवा दुसरा कोणी मनुष्य आपलें अंग शंखमुद्रेनें अंकित करुन तुलसीमंजरी धारण करणारा व गोपीचंदनाचा अंगास लेप केलेला असा मनुष्य पाहिला असतां त्याला (पाहाणाराला) पातक कोठून होणार ? ” असें काशीखंडवचन आहे. तो तप्तमुद्राधारणप्रकार तर रामार्चनचंद्रिकेपासून जाणावा.

पृथ्वीचंद्रोदयादयस्तु
यस्तुसंतप्तशंखादिलिंगचिह्नतनुर्नरः
ससर्वयातनाभोगीचंडालोजन्मकोटिषु
द्विजंतुतप्तशंखादिलिंगांकिततनुंनरः
संभाष्यरौरवंयातियावदिंद्राश्चतुर्दशेतिबृहन्ना
शंखचक्राद्यंकनंचगीतनृत्यादिकंतथा
एकजातेरयंधर्मोनजातुस्याद्दूजन्मनः

शंखचक्रेमृदायस्तुकुर्यात्तप्तायसेनवा सशूद्रवद्बहिः
कार्यः सर्वस्माद्द्विजकर्मणः
यथाश्मशानजंकाष्ठमनर्हंसर्वकर्मसु तथाचक्रांकितोविप्रः
सर्वकर्मसुगर्हितः तथा
शिवकेशवयोरंकांश्छूलचक्रादिकान् द्विजः
नधारयेतमतिमान्वैदिकेवर्त्मनिस्थित
इतिविष्णवाश्वलायनादिवचनात्
ॠग्वेदादिश्रुतीनामन्यार्थत्वादन्यश्रुतीनांचा
चक्रादिधारणंशूद्रविषयमित्यूचुः
नृत्यंचोदरार्थंनिषिद्धमितिश्रीधरस्वामी
यद्यपिनिषेधस्यप्राप्तिसापेक्षत्वाद्विधिंविन
नतौपशौकरोतीतिवद्विकल्पोयुक्तस्तथापि
एकजातेरयंधर्म इत्यनेनविधिवाक्यानामुपसंहारात्
द्विजातिनिषेधो नित्यानुवाद इतितदाशयः
अत्रशिष्टाचारएवसंकटपाशनिः सरणसृणिरितिसंक्षेपः ।

पृथ्वीचंद्रोदयादिक ग्रंथकार तर “ जो तप्तशंखादिमुद्रायुक्तशरीर मनुष्य तो सर्व यातना भोगणारा व कोटि जन्माचेठायीं चांडाल होतो. तप्तशंखादिचिह्नांनीं अंकित आहे शरीर ज्याचें अशा द्विजाशीं जो मनुष्य भाषण करितो तो चवदा इंद्र

आहेत तोंपर्यंत रौरव नरकांत जातो ” अशा बृहन्नारदीय वचनावरुन; आणि “ शंखचक्रादिकांनीं शरीर अंकित करणें व गीत, नृत्य इत्यादिक करणें हा एकजातीचा (शूद्राचा) धर्म होय, द्विजातींचा मुळींच धर्म नाहीं. जो मृत्तिकेनें किंवा तापविलेल्या लोखंडानें शरीरावर शंखचक्रें करील त्याला सर्व ब्राह्मणकर्मापासून शूद्रासारखा बाहेर करावा. जसें स्मशानांतील काष्ठ सर्वकर्मांस अयोग्य तसा चक्रांकित ब्राह्मण सर्व कर्माविषयीं निंद्य होय. ” तसेंच “ वैदिकमार्गीं स्थित अशा बुद्धिवान् ब्राह्मणानें शिव व विष्णु यांच्या शूलचक्रादिक मुद्रा धारण करुं नयेत ” ह्या विष्णु, आश्वलायन इत्यादिकांच्या वचनांवरुन व ऋग्वेदादिक श्रुतींचा अन्य अर्थ असल्यामुळें (म्हणजे ‘ अतप्ततनूर्नतदामोअश्रुते ’ या मंत्राचा अर्थ - पयोव्रतादिकेंकरुन ज्याची तनू तप्त झाली नाहीं त्याला सोमरसाची प्राप्ति नाहीं - इत्यादि अर्थ असल्यांमुळें) व इतर श्रुति

मुळींच नसल्यामुळें चक्रादिकामुद्राधारण विषयक आहे, असें सांगते झाले. नृत्य हें उदरभरण्याकरितां निषिद्ध

आहे, भगवंताकरितां निषिद्ध नाहीं, असें श्रीधरस्वामी सांगतो. आतां बृहन्नारदीय - विष्णु - आश्वलायनादि वचनांनीं तप्तमुद्राधारणाचा निषेध केला. यावरुन तप्तमुद्राधारणाची प्राप्ति आहे असें होतें व ती प्राप्ति विधीवांचून संभवत नाहीं, म्हणून त्याचा विधि आहे, असें होतें. ज्याच्या आश्रयानें जो झाला तो त्याचा (आश्रयाचा) सर्वथा बाध करीत नाहीं असा न्याय आहे, जसें - ‘ नतौ पशौ करोति ’ म्हणजे पशुयागाचे ठायीं आज्यभाग करीत नाहीं असा निषेध केला तरी तो निषेध आज्यभागांचा सर्वथा बाध करीत नाहीं. करील तर उपजीव्याचा (आश्रयाचा) विरोध होईल म्हणून एकवेळ बाध व एकवेळ आज्यभागांची प्रवृत्ति, याप्रमाणें विकल्प होतो, तसा येथें एकदां विधि एकदा निषेध अर्थात् विकल्प युक्त आहे, असें जरी आहे तरी ‘ एकजाति जो शूद्र त्याचा हा धर्म ’ या वाक्यानें तप्तमुद्राधारणाचीं जीं सामान्य वाक्यें त्यांचा उपसंहार म्हणजे - अनेकांविषयीं प्रवृत्त जीं तप्तमुद्राधारणाचीं सामान्य वाक्यें त्यांचा एक विषयावर म्हणजे केल्यामुळें द्विजातीला जो तप्तमुद्राधारणनिषेध केला

तो अपूर्व नाहीं, तर नित्य जी अप्राप्ति त्याचाच अनुवाद (सिद्धकथन) आहे, असा पृथ्वीचंद्रोदयादि ग्रंथांचा आशय होय. ह्या वरील सर्व वाक्यांच्या तात्पर्यावरुन तप्तमुद्राधारण केलें तरी दोष आणि न केलें तरी दोष असा संकटपाश आला त्यांतून सुटण्याला मार्ग म्हटला म्हणजे एक शिष्टाचारच आहे. म्हणजे जसा शिष्टाचार असेल तसें करावें, हा सारांश थोडक्यांत समजावा.

आषाढपौर्णमास्यांकोकिलाव्रतमुक्तंहेमाद्रौ
आषाढपौर्णमास्यांतुसंध्याकालेह्युपस्थिते
संकल्पयेन्मासमेकंश्रावणेप्रत्यहंह्यहं
स्नानंकरिष्येनियताब्रह्मचर्येस्थितासती
भोक्ष्यामिनक्तंभूशय्यांकरिष्येप्राणिनांदयाम
अस्यनक्तव्रतत्वात्सायाह्नव्यापिनीग्राह्या
अत्रैवशिवशयनोत्सव उक्तो हेमाद्रौवामनपुराणे
पौर्णमास्यामुमानाथः स्वपतेचर्मसंस्तरे
वैय्याघ्रेचजटाभारंसमुद्ग्रथ्याहिवर्ष्मणा मदनरत्नेप्येवं
इयंचप्रदोषव्यापिनी अत्रैवव्यासपूजोक्ता
तत्रत्रिमुहूर्ताचेत्परैवेतिसंन्यासपद्धतौ
त्रिमुहूर्ताधिकंग्राह्यंपर्वक्षौरप्रणामयोरिति

इतिश्रीरामकृष्णभट्टात्मजदिनकरभट्टानुजकमल
आषाढः समाप्तः ॥

आषाढपौर्णमासीस कोकिलाव्रत सांगतो हेमाद्रींत भविष्यांत - “ आषाढ पौर्णमासीचे ठायीं संध्याकाल प्राप्त असतां असा संकल्प करावा कीं,
‘ श्रावणाचेठायीं एक महिना प्रत्यहीं स्नान करीन व नियम धारण करुन ब्रह्मचर्यव्रतानें राहून नक्तभोजन करीन, भूशय्या करीन, व प्राण्यांवर दया करीन ’ अशा अर्थाचा संकल्प करावा. ” हें व्रत नक्तव्रत असल्यामुळें ही आषाढी सायाह्नव्यापिनी घ्यावी. याच तिथीस शिवशयनोत्सव सांगतो. हेमाद्रींत वामनपुराणांत -
“ आषाढ पौर्णमासीचेठायीं उमापति (शंकर) सर्पशरीरानें आपला जटाभार बांधून व्याघ्रचर्मावर शयन करितो. ” मदनरत्नांतही असेंच सांगितलें आहे. ही पौर्णिमा शिवशयनोत्सवाविषयीं प्रदोषव्यापिनी घ्यावी. याच तिथीला व्यासपूजा सांगितली आहे. व्यासपूजेविषयीं दुसर्‍या दिवशीं तीन मुहूर्त (६ घटिका) असेल तर पराच घ्यावी, असें संन्यासपद्धतींत सांगितलें आहे. कारण, “ क्षौर व नमस्कार याविषयीं

पर्व घ्यावयाचें तें तीन मुहूर्तांहून अधिक असेल तें घ्यावें ” असें वचन आहे.

संकलन :- अशोककाका कुलकर्णी

पाचेगावकर

९०९६३४२४५१